**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :- ०५**

नगरसचिव कार्यालय
दिनांक :-१९/०९/२०११

प्रति,
मा. -------------------------------------

स्थायी समिती, सदस्य
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची **सभा क्र. ०५ शुक्रवार दि. २३/०९/२०११ रोजी दुपारी १.०० वाजता** महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील **मा.स्थायी समिती सभागृह कार्यालयात** खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती.

सही /-
प्र.नगरसचिव,
मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये अहमदनगर महानगरपालिका.

**शुक्रवार दिनांक- २३/०९/२०११ ची विषय पत्रिका**

| **विषय क्र.** | **विषय सुची** |
|---|---|
| ४२ | मा.स्थायी समिती सभा क्रमांक ०४ बुधवार दिनांक ७/९/२०११ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे. |
| ४३ | उपविभागीय कृषी अधिकारी भेट योजना भुतकरवाडी पंपिंग स्टेशन रोड वॉर्ड क्र.४८ यांचे मिळकतीस असलेले नळ कनेक्शन बंद केलेले असूनही त्यांना आलेले सन २००४-२००५ पासून ते २०१०-२०११ अखेर पाणीपट्टी रूपये १,५४,०००/- चे बील क्रमांक ४५६/१ निर्लेखित करण्यांस व त्याप्रमाणे संगणक व टाचण रजिस्टरला नोंद घेणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट |
| ४४ | अहमदनगर महानगरपालिका शहर बससेवा प्रवास भाडे दरात, डिझेल टायर तसेच स्पेअर पार्टचे किंमती मध्ये वाढ झाल्याने प्रस्तावीत प्रवासी भाडे दरवाढीस मंजूरी मिळणे बाबत व्यवस्थापक श्री. दिपक मगर , अहमदनगर शहर बस सेवा यांचा अर्ज व त्यावरील ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ. |
| ४५ | अहमदनगर महानगरपालिकेचे कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना व सुतिकागृह येथे तात्पुरत्या स्वरूपात डॉ. प्रतिभा आर.भोसले (भुलतज्ञ) यांचा कंत्राटी करारानुसार अटी शर्ती प्रमाणे भुल तज्ञांच्या पॅनल मध्ये समाविष्ठ करणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ. |

सही /-
प्र. नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

**सोबत-** १] विषय क्र.४२ - मा.स्थायी समिती सभा क्र. ०४ बुधवार दिनांक ७/९/२०११ रोजीच्या सभेचे इतिवृत्ताची प्रत
२] विषय क्र. ४३ ते ४५ च्या प्रस्तावाच्या झेरॉक्स प्रती

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०५**

विषय क्रमांक- ४२ शुक्रवार दिनांक २३/९/२०११

ठराव क्रमांक- ४२ शुक्रवार दिनांक २३/९/२०११

**प्रस्तावाचा विषय :-**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०४ बुधवार दिनांक ७/९/२०११ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे.

**प्रस्तावाचा मजकुरः-** मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०४, बुधवार दिनांक ७/९/२०११ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणेसाठी मा.स्थायी समिती समिती पुढे ठेविले.

सबब कार्यवृत्त मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

हा विषय सभेमध्ये वाचून दाखविला असता त्यावर सभेमध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- मागिल सभा दिनांक ७/९/२०११ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे आहे.

मा.श्री. लोंढे सु.सो. :- मागिल सभा दिनांक ७/९/२०११रोजीचे सभेत मंजूर केलेले विषय वाचून दाखविण्यांत यावे.

त्याप्रमाणे मा.स्थायी समिती सभा दिनांक ७/९/२०११ रोजीचे मध्ये पारित केलेले विषय वाचून दाखविणेत आले.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- मागिल सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत यावी.

मा.श्री. लोंढे सु.सो. :- मागिल सभा दिनांक ७/९/२०११ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करावे.

मा.सभापती साहेब :- मागिल स्थायी समिती सभा दिनांक ७/९/२०११ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी.

**ठराव :-** मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०४ बुधवार दिनांक ७/९/२०११ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे.

सुचक :- मा.श्री. डागवाले किशोर आसाराम सही /-

अनुमोदक :- मा.श्री. लोंढे सुभाष सोपानराव सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-

सभापती,

स्थायी समिती

अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-०५**

विषय क्रमांक- ४३ शुक्रवार दिनांक २३/९/२०११

ठराव क्रमांक- ४३ शुक्रवार दिनांक २३/९/२०११

**प्रस्तावाचा विषय :-** उपविभागीय कृषी अधिकारी भेट योजना भुतकरवाडी पंपिंग स्टेशन रोड वॉर्ड क्र.४८ यांचे मिळकतीस असलेले नळ कनेक्शन बंद केलेले असूनही त्यांना आलेले सन २००४-२००५ पासून ते २०१०-२०११ अखेर पाणीपट्टी रूपये १,५४,०००/- चे बील क्रमांक ४५६/१ निर्लेखित करण्यांस व त्याप्रमाणे संगणक व टाचण रजिस्टरला नोंद घेणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर म.न.पा. सावेडी वसुली विभाग जा.नं. दिनांक

विषय- वसुली वॉर्ड क्र.४८ बिल क्र.४५६/१ भुतकरवाडी, पंपीग स्टेशन रोड या ठिकाणी असलेल्या बंद नळ कनेक्शनची पाणीपट्टी निर्लेखित करणेबाबत.

सादर,

सावेडी हेडवसुली यांजकडून अहवाल देण्यात येतो की, सावेडी उपकार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील वसुली वॉर्ड क्र.४८ मधील बिल नं. ४५६/१ या ठिकाणी असलेले मिळकतदार उपविभागीय कृषी अधिकारी भेट योजना, भुतकरवाडी, पंपीग स्टेशन रोड यांनी दिलेल्या १५/२/२०११ रोजी अर्ज देवुन नळ कनेक्शनचे बिल रद्द करणे बाबत अर्ज केलेला आहे.

संबंधीत अर्जदार यांचे अर्जाप्रमाणे फिटरमार्फत समक्ष पाहणी केली असता सदरचे नळ कनेक्शन बंद असुन त्यावरील पाणीपट्टी आकारणी वसुली विभागाकडुन चालू आहे. तरी अर्जदार यांनी वारंवार दिलेल्या अर्जात नमुद केले की, सदर नळ कनेक्शन बंद केलेले असुनही त्यावरील पाणीपट्टी अदयापपावेतो चालु आहे.

तरी अर्जदार यांची पाणीपट्टी सन २००४-२००५ पासून ते २०१०-२०११ अखेर रू.१,५४,०००/- बिलात दर्शविलेली आहे. सदरचे कार्यालय हे शासकीय आहे तरी सदर थकबाकी रद्द करणेबाबत वेळोवेळी दिलेल्या अर्जानुसार पडताळणी केली असता तत्कालीन लिपीक यांनी संबंधीत मिळकतदार यांचे अर्जानुसार घरपट्टी व पाणीपट्टी पुर्ण भरून विहीत नमुन्यामध्ये पाणीपुरवठा विभागाकडे नळ कनेक्शन बंद बाबतचा अहवाल तत्कालीन लिपिक यांनी सादर न केल्याने अदयापपावेतो सदर बिलावर पाणीपट्टी चालु आहे.

तरी त्यानुसार उपलब्ध सर्व कागदपत्रांची व आवश्यक असलेल्या अर्जाची पडताळणी करून त्यावर पाणीपुरवठा फिटर यांचा रिपोर्ट व मा. मुख्य लेखा परिक्षक यांचा अहवाल तसेच मा.उपायुक्तसाहेब यांची मान्यता घेवुन व त्यानुसार मा.आयुक्तसाहेब यांची मंजुरी घेवुन सदर पाणीपट्टी रद्द करणेबाबत मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १५२ नुसार मा.स्थायी समितीच्या मान्यतेने निर्लेखित करण्याबाबत व त्याप्रमाणे संगणक व टाचण रजिष्टर ला नोंद घेण्याबाबत मान्यतेस्तव सादर.

येणेप्रमाणे प्रभाग अधिकारी प्रभाग समिती क्र.१ यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

हा विषय सभेमध्यें वाचून दाखविला असता त्यावर सभेमध्यें झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- उपविभागीय कृषी अधिकारी भेट योजना भुतकरवाडी पंपींग स्टेशन यांचे मिळकतीस असलेले नळ कनेक्शन बंद केलेले असून ही त्यांना आलेले बील निर्लेखित करणेस मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. लोंढे सु.सो. :- मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा.

<u>**ठराव :-**</u> उपविभागीय कृषी अधिकारी भेट योजना भुतकरवाडी पंपिंग स्टेशन रोड वॉर्ड क्र.४८ यांचे मिळकतीस असलेले नळ कनेक्शन बंद केलेले असूनही त्यांना आलेले सन २००४-२००५ पासून ते २०१०-२०११ अखेर पाणीपट्टी रूपये १,५४,०००/-(रूपये एक लाख चौपन्न हजार फक्त) चे बील क्रमांक ४५६/१ निर्लेखित करण्यांस व त्याप्रमाणे संगणक व टाचण रजिस्टरला नोंद घेणेस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. डागवाले किशोर आसाराम सही /-

अनुमोदक :- मा.श्री. लोंढे सुभाष सोपानराव सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-०५**

विषय क्रमांक- ४४ शुक्रवार दिनांक २३/९/२०११

ठराव क्रमांक- ४४ शुक्रवार दिनांक २३/९/२०११

**प्रस्तावाचा विषय :-**अहमदनगर महानगरपालिका शहर बससेवा प्रवास भाडे दरात,डिझेल टायर तसेच स्पेअर पार्टचे किंमती मध्ये वाढ झाल्याने प्रस्तावीत प्रवासी भाडे दरवाढीस मंजूरी मिळणे बाबत व्यवस्थापक श्री.दिपक मगर,अहमदनगर शहर बस सेवा यांचा अर्ज व त्यावरील ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका पाणीपुरवठा विभाग दिनांक /०७/२०११

विषय- शहर बससेवा प्रवास भाडे दरवाढीबाबत.
संदर्भ :- अहमदनगर महानगरपालिका शहर बससेवा ,अ.नगर जा.क्र.१६
दि.१९/७/२०११

मा.सादर,

उपरोक्त संदर्भ व विषयान्वये सादर करण्यांत येते की, शहर बससेवा प्रसन्ना पर्पल मोबी. सोल्यु. प्रा.लि. पुणे या संस्थेस अभिकर्ता संस्था नेमून दि.२४ फेब्रुवारी २०११ पासून सुरू करण्यांत आलेली आहे. बससेवा कार्यान्वीत झाल्यानंतर दोन वेळेस डिझेलच्या किंमतीमध्ये वाढ झाली आहे. तसेच टायर व स्पेअर पार्टच्या किंमतीमध्ये देखील वाढ झाल्याने बससेवेच्या व्यवस्थापनावर अतिरिक्त आर्थिक बोजा पडत आहे.

एस.टी.महामंडळाने देखील प्रवास भाडयामध्ये वाढ करणेबाबत मंजूरी दिलेली असून त्याचधर्तीवर बससेवेच्या प्रवासी भाडयामध्ये वाढ करणेबाबतचा प्रस्ताव देण्यांत यावा. तसेच सोबत महाव्यवस्थापक [वाहतूक] महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मुंबई यांचे प्रवासी भाडेदरात झालेल्या वाढीबाबत परिपत्रक देखील जोडले आहे. त्याचप्रमाणे सध्याचे दर व प्रस्तावीत दर सोबत जोडले असून प्रस्तावीत दराप्रमाणे भाडेवाढीस मंजूरी देणेबाबत संदर्भिय पत्र प्राप्त झाले आहे.

महानगरपालिकेमध्ये परिवहन समिती अस्तित्वात नसल्याने सर्व अधिकार मा.स्थायी समितीला देण्यात आलेले आहेत. संदर्भीय पत्रानुसार प्रवासी दरामध्ये वाढ करणे असल्यास प्रस्ताव मा.स्थायी समिती पुढे ठेवावा लागेल. तरी प्रस्तावाबाबत पुढील योग्य तो आदेश होणेस विनंती.

येणेप्रमाणे मोटार व्हेईकल क्लार्क यांचा अहवाल असे.

--**--

मोटार व्हेईकल विभाग :- मनपा शहर बस वाहतूक अभिकर्ता संस्थेच्या उक्त मागणीचा विचार करणेकामी मागणी मा.स्थायी समितीकडे सादर करणेस्तव मंजुरीस्तव सादर.

मा.उपायुक्त (कर) :- अभिकर्ता म्हणून नेमल्याच्या मूळ Conlract सह फेरसादर करावे.

फेरसादर,

(१) करारनाम्यानुसार व नियमानुसार प्रवासी भाडयामध्ये बदल करतांना मा.प्रादे.परिवहन प्राधि.व मा.स्थायी समिती यांची मंजुरी घेणेसाठी मा.प्रादे. परिवहन प्राधि.,अहमदनगर यांना पत्र देणेसाठी व फेरबदल प्रस्ताव मा.स्थायी समिती पुढे ठेवणेसाठी आदेशार्थ सादर.

(२) महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ यांचे परिपत्रकानुसार सुधारित भाडेदर तक्त्यानुसार २ कि.मी. ते ३२ कि.मी. पर्यत रू.०१/ भाडेवाढ तसेच ३२ कि.मी. नंतर रू.०२/- भाडेवाढ केली आहे. परंतु संबंधीत अभिकर्ता यांनी १० कि.मी. पुढे रू.०२/- अशी वाढ केली आहे सदर बाब मा.स्थायी समितीच्या निदर्शनास आणणेबाबत मान्यतेस्तव सादर.

मा.आयुक्त साहेब :- M.E. कृ. चर्चा, चर्चा केली मा.स्थायी समितीपुढे ठेवा. दिनांक २/९/२०११

--**--

दिनांक-१९/७/२०११

मा.आयुक्त साहेब,
अहमदनगर महानगरपालिका.
अहमदनगर.

विषय- AMT शहर बस-सेवा प्रवास भाडे दरवाढीचा प्रस्ताव.

मा.महोदय,

अहमदनगर महानगरपालिकेने शहर हद्द व हद्दीबाहेर शहरवासीयांच्या सोयीकरीता बांधा, वापरा व मालकी (Build,Operate and Own)या तत्वावर प्रसन्ना पर्पल मोबिलीटी सोल्युशन्स,पुणे यांना अभिकर्ता म्हणुन नियुक्त करून दिनांक २४ फेब्रु.२०११ पासून शहर बससेवा सुरू केली आहे.सदरची बससेवा कार्यान्वित झाल्यानंतर डिझेलच्या किंमतीमध्ये दोनवेळा(दिनांक २५/०६/२०११ व दिनांक०१/०७/२०११) वाढ झाली असून परिणामी शहर बसव्यवस्थापनास प्रति लिटर डिझेलला रू.३.१९/-अधिक खर्च करावा लागत आहे. त्याचप्रमाणे टायर व स्पेअर पार्ट्स यांच्या किंमतीतही लक्षणीय वाढ झालेली आहे. त्यामुळे शहर बसव्यवस्थापनावर अतिरिक्त आर्थिक बोजा पडत आहे.

नुकतेच महाराष्ट्र शासन व राज्य परिवहन प्राधिकरणाने या सर्व बाबींचा साकल्याने विचार करून प्रवास भाडयामध्ये वाढ करण्यास एस.टी. महामंडळास मंजूरी प्रदान केली असून, त्यानुसार एस.टी. महामंडळाने ग्रामीण तसेच शहरी सेवा यांच्या प्रवास भाडयामध्ये दिनांक ९ जुलै २०११ पासून वाढ केली आहे.

विनंती करण्यात येत आहे की, एस.टी. महामंडळाच्या धर्तीवर अहमदनगर महानगरपालिका परिवहन बससेवे (AMT) ला सुध्दा प्रवास भाडे दरामध्ये वाढ करण्यास अनुमती देवुन भाडे वाढीचा प्रस्ताव संबंधीत परिवहन प्राधिकरणाकडे लवकरात लवकर सादर करावा.

सोबत सहपत्र म्हणून, महाव्यवस्थापक (वाहतूक), महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मुंबई-४००००८ यांचे प्रवासी दरात झालेल्या दरवाढीची अंमलबजावणी बाबतचे वाहतूक खाते परिपत्रक क्र.२३/२०११ दिनांक ७ जुलै २०११ अवलोकनार्थ जोडण्यात येत आहे.

AMT करीता प्रस्तावीत प्रवासी भाडे दर तक्ता पुढीलप्रमाणे असून त्यात प्रस्तावीत केलेले दर हे एस.टी. महामंडळाने शहरसेवेकरीता दि.०९/०७/२०११ पासून अंमलात आणलेल्या दराप्रमाणे आहेत.

**शहर बससेवा  विद्यमान व प्रस्तावित भाडे दर तक्ता**

| किलोमिटर | | सध्या लागू असलेले दर | | प्रस्तावित दर | |
|---|---|---|---|---|---|
| EXCEEDING | NOT EXCEEDING | प्रौढ | मुल | प्रौढ | मुल |
| किमी पेक्षा जास्त | किमी पर्यंत | | | | |
| ० | २ | ५.०० | ३.०० | ६.०० | ३.०० |
| २ | ४ | ५.०० | ३.०० | ६.०० | ३.०० |
| ४ | ६ | ६.०० | ३.०० | ७.०० | ४.०० |
| ६ | ८ | ७.०० | ४.०० | ८.०० | ४.०० |
| ८ | १० | ९.०० | ५.०० | १०.०० | ५.०० |
| १० | १२ | १०.०० | ५.०० | १२.०० | ६.०० |
| १२ | १४ | १२.०० | ६.०० | १४.०० | ७.०० |
| १४ | १६ | १३.०० | ७.०० | १६.०० | ८.०० |
| १६ | १८ | १५.०० | ८.०० | १९.०० | १०.०० |
| १८ | २० | १७.०० | ९.०० | २१.०० | ११.०० |
| २० | २२ | २०.०० | १०.०० | २३.०० | १२.०० |
| २२ | २४ | २४.०० | १२.०० | २५.०० | १३.०० |
| २४ | २६ | २६.०० | १३.०० | २७.०० | १४.०० |
| २६ | २८ | २८.०० | १४.०० | २९.०० | १५.०० |
| २८ | ३० | ३०.०० | १५.०० | ३१.०० | १६.०० |
| ३० | ३२ | ३०.०० | १५.०० | ३२.०० | १६.०० |
| ३२ | ३४ | ३२.०० | १६.०० | ३३.०० | १७.०० |
| ३४ | ३६ | ३२.०० | १६.०० | ३४.०० | १७.०० |
| ३६ | ३८ | ३४.०० | १७.०० | ३६.०० | १८.०० |
| ३८ | ४० | ३४.०० | १७.०० | ३६.०० | १८.०० |
| ४० | ४२ | ३६.०० | १८.०० | ३७.०० | १९.०० |
| ४२ | ४४ | ३६.०० | १८.०० | ३८.०० | १९.०० |
| ४४ | ४६ | ३८.०० | १९.०० | ३९.०० | २०.०० |
| ४६ | ४८ | ३८.०० | १९.०० | ४०.०० | २०.०० |
| ४८ | ५० | ४०.०० | २०.०० | ४२.०० | २१.०० |

सदर भाडे दरात बालपोषण अधिभार समाविष्ट आहे.

कृपया वरील प्रस्तावित भाढेवाढीस मंजूरी दयावी.

येणेप्रमाणे  श्री. दिपक मगर, व्यवस्थापक अहमदनगर शहर बससेवा यांचे  जा.नं.१६/२०११ दिनांक १९/७/२०११ रोजीचे पत्र

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

हा विषय सभेमध्यें वाचून दाखविला असता त्यावर सभेमध्यें झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- डिझेल टायर तसेच स्पेअर पार्टचे किंमती मध्ये वाढ झाल्याने शहर बस सेवा प्रवासी भाडे दरात वाढ करणेस मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. लोंढे सु.सो. :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविणेत आला.

मा.श्री.लोंढे सु.सो. व मा.श्री. भोसले ग.पुं. :- शहर बससेवेचे प्रवासी भाडे दरामध्ये वाढ करणे बाबतची अट करारनाम्यामध्ये होती का ?

मॅके.इंजि. श्री. निकम पी.जे. :- शहर बस सेवेचे प्रवासी भाडे दरामध्ये वाढ करणे बाबत करारनाम्या मधील अट क्रमांक ६ वाचून दाखवितो "शहर बस सेवेचे प्रवासी भाडे दरामध्ये " मा.स्थायी समितीचे मंजूरी नुसार मा. शासनाचे निर्देशानुसार व नाशिक परिवहन कार्यालय यांचे मंजूरीने प्रवासी भाडे दरात वाढ करता येईल.

मा.श्री. लोंढे सु.सो. व मा.श्री. डागवाले कि.आ. :- प्रवासी भाडे दरात वाढ कशी होणार आहे.

मॅके.इंजि श्री. निकम पी.जे.:- दोन किलो मीटर पर्यत व चार किलोमीटर पर्यत सध्या प्रौढास रूपये ५ व मुलांना रूपये ३ प्रमाणे भाडे घेतले जाते. त्यामध्ये प्रौढास फक्त रूपया १/- वाढवून रूपये ५/- ऐवजी रूपये ६/- अशी भाडे वाढ सुचविली आहे. मुलांकरिताचे भाडे दरात वाढ केलेली नाही.त्यांनी सुचविलेली दरवाढ पुढील प्रमाणे आहे.

| किलोमिटर | | सध्या लागू असलेले दर | | प्रस्तावित दर | |
|---|---|---|---|---|---|
| EXCEEDING | NOT EXCEEDING | प्रौढ | मुल | प्रौढ | मुल |
| किमी पेक्षा जास्त | किमी पर्यंत | | | | |
| ० | २ | ५.०० | ३.०० | ६.०० | ३.०० |
| २ | ४ | ५.०० | ३.०० | ६.०० | ३.०० |
| ४ | ६ | ६.०० | ३.०० | ७.०० | ४.०० |
| ६ | ८ | ७.०० | ४.०० | ८.०० | ४.०० |
| ८ | १० | ९.०० | ५.०० | १०.०० | ५.०० |
| १० | १२ | १०.०० | ५.०० | १२.०० | ६.०० |
| १२ | १४ | १२.०० | ६.०० | १४.०० | ७.०० |
| १४ | १६ | १३.०० | ७.०० | १६.०० | ८.०० |

त्याच प्रमाणे या पुढील दर दिलेले असून एकूण ५० किलो मीटर पर्यत सध्याचे प्रौढास दर रू.४० व मुलांस रूपये २० असे असुन प्रस्तावित दर प्रौढास ४२ व मुलांस २१ प्रमाणे भाडेवाढ दर्शविलेली आहे.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- सरासरी भाडेवाढ दिली नाही.

मॅके. इंजि. श्री. निकम पी.जे. :- ० ते २ , २ ते ४ , ४ ते ६, ६ ते ८ किलोमीटर याप्रमाणे टप्प्या नुसार भाडेवाढ दर्शविलेली आहे.

मा.श्री. लोंढे सु.सो. :- एस.टी.स्टॅन्ड पासून विळद येथे जाण्यासाठी किती भाडेवाढ होणार आहे. बसवर केलेल्या जाहिरातीचे पैसेही तेच घेतात का ?

मॅके. इंजि. श्री. निकम पी.जे. :- रूपया एक वाढेल.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- महानगरपालिकेचे प्रवासी वाहतुकीचे बसवर जाहिरात करण्यांस परवानगी दिली होती का ?

मॅके.इंजि. श्री. निकम पी.जे. :- जाहिरातीला परवानगी दिली होती. बसवरील जाहिरातीचे उत्पन्न ही तेच घेतात अभिकर्ता संस्थेच्या सध्या २३ बस सुरू असुन ते आणखी सहा बस मागविणार आहेत.

मा.श्री. कोतकर सु. स. :- एस.टी.स्टॅन्ड पासून ते चास गावापर्यत आडसुळ कॉलेज इत्यादी शैक्षणिक संस्था असल्याने चास गावापर्यत शहर बस सेवा पुरविण्यांत यावी.

मॅके.इंजि. श्री. निकम पी.जे. :- अभिकर्ता संस्थेने प्रस्ताव दिले नंतर त्या वर ऑफिसचे टिप्पणीसह प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर केला जाईल. चासपर्यत बससेवा सुरू करणेचा मागणी होती.

मा.श्री. लोंढे सु.सो. :- बसचे अपघाताची जबाबदारी कुणाची मनपा हद्दीबाहेर अपघात झाल्यास काय ?

मॅके.इंजि. श्री. निकम पी.जे. :- आपले कडेस त्याची जबाबदारी नाही. ड्रायव्हर वाहक इत्यादी कर्मचा-याची ही जबाबदारी आपलेकडेस नाही. ही सर्व जबाबदारी अभिकर्ता संस्थेची आहे.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- भाव वाढीचा बोजा सर्व सामन्यावर येतो डिझेलचे भाव कधी वाढले डिझेलचे भाव वाढले नंतरच कार्यवाही करावी.

मा.श्री. लोंढे सु.सो. व मा.श्री. भोसले ग.पुं. :- सध्या डिझेलचे भाव वाढलेले नाहीत. बस सेवेच्या मार्गाचा विचार करून त्यांना अंतर वाढवून देणे व भाडे दर वाढवून देणे बाबत प्रस्तावाचा नंतर विचार करावा सध्या लागेच भाडेवाढ करू नये सदर प्रकरणी नंतर निर्णय घ्यावा प्रस्ताव स्थगित ठेवावा.

मा.श्री. डागवाले कि.आ.:- पुढील सभेत निर्णय घ्यावा प्रस्ताव स्थगित ठेवावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका शहर बस सेवेचे प्रवासी भाडे दरात वाढ करणे विषयीचा प्रस्ताव सर्वानुमते स्थगित ठेवणेत यावा.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिका शहर बससेवा प्रवासी भाडे दरात वाढ करणे बाबत प्रस्ताव स्थगित ठेवावा.

सुचक :- मा.श्री. लोंढे सुभाष सोपानराव. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. डागवाले किशोर आसाराम सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-०५**

विषय क्रमांक- ४५ शुक्रवार दिनांक २३/९/२०११

ठराव क्रमांक- ४५ शुक्रवार दिनांक २३/९/२०११

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना व सुतिकागृह येथे तात्पुरत्या स्वरूपात डॉ. प्रतिभा आर.भोसले (भुलतज्ञ) यांचा कंत्राटी करारानुसार अटी शर्ती प्रमाणे भुल तज्ञांच्या पॅनल मध्ये समाविष्ठ करणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकुर :-**अ.नगर मनपा आस्थापना विभाग जा.क्र. ५४ दिनांक ८/९/२०११

विषय- कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना व सुतिका गृह येथे तात्पुरत्या स्वरूपात भुलतज्ञांच्या पॅनलमध्ये डॉ. प्रतिभा आर. भोसले (भुलतज्ञ) यांची कंत्राटी करारानुसार अटी व शर्ती प्रमाणे समाविष्ट करणे बाबत.

सादर,

मा.मुख्य वैद्यकीय अधिकारी यांनी त्यांचेकडील जा.क्र. कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना व सुतिका गृह २१२ दिनांक १२/७/२०११ अन्वये प्रस्ताव सादर करून त्यामध्ये "मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ८३ दिनांक १२/०१/२०११ अन्वये अहमदनगर महानगरपालिकेमधील कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना व सुतिका गृह येथे रूग्णांच्या दैनंदिन ऑपरेशन कामी शहरातील १६ भुलतज्ञांना तात्पुरत्या स्वरूपात भुलतज्ञ म्हणुन प्रत्येक मेजर ऑपरेशन करीता रूपये ५००/- (रू. पाचशे फक्त) व प्रत्येक मायनर ऑपरेशन करीता रू.२५०/- (रू. दोनशे पन्नास फक्त) यावर ६/०१/२०११ ते ५/०१/२०१४अखेर तीन वर्षाकरिता पॅनलशिपवर करारबध्द करण्यांत आलेले आहे. तद्नंतर डॉ. प्रतिभा आर. भोसले (एम.बी.बी.एस.डि.ए.) यांनी भुलतज्ञ म्हणुन कॉल बेसीसवर काम करण्यास तयार असले बाबत दिनांक १०/०६/२०११ रोजी विनंती अर्ज केलेला आहे. डॉ. प्रतिभा आर. भोसले यांच्या विनंती अर्जानुसार त्यांना स्थायी समिती ठराव क्रमांक ८३ दिनांक १२/०१/२०११ नुसार करारच्या अटी व शर्तीवर सध्याच्या भुलतज्ञांच्या पॅनलमध्ये समाविष्ट करणे उचित वाटते." असे नमुद करून सुचित केलेले आहे.

मुख्य वैद्यकीय अधिकारी, कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना यांचे वरील प्रस्तावाच्या अनुषंगाने कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना व सुतिका गृह येथे तात्पुत्या स्वरूपात भुलतज्ञ या पदी डॉ. प्रतिभा आर. भोसले यांची मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ८३ दिनांक १२/१/२०११ मध्ये नमुद केल्याप्रमाणे सदर इतर कालावधी करिता दर्शविलेल्या मानधनाप्रमाणे समाविष्ट करणे झाल्यास मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी घेवुन अटी व शर्ती नुसार करारबध्द नियुक्ती बाबत कार्यवाही करणे उचित होईल.

तरी सदरचा प्रस्ताव मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील तरतुदी नुसार मा.स्थायी समिती पुढे निर्णयास्तव सविनय सादर.

येणेप्रमाणे आस्थापना प्रमुख यांना अहवाल असे.
सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

हा विषय सभेमध्ये वाचून दाखविला असता त्यावर सभेमध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेचे कै. बा.दे. दवाखाना व सुतिका गृह येथे भुलतज्ञ म्हणून डॉ. प्रतिभा भोसले यांचा भुलतज्ञांचे पॅनल मध्ये समावेश करणेस मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना व सुतिकागृह येथे तात्पुरत्या स्वरूपात डॉ. प्रतिभा आर.भोसले (भुलतज्ञ) यांना कंत्राटी करारानुसार अटी शर्ती प्रमाणे भुलतज्ञांच्या पॅनल मध्ये समाविष्ठ करणेस मंजूरी देण्यांत येत आहे ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढिल कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. भोसले गणेश पुंडलिक. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. डागवाले किशोर आसाराम. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-<br>
सभापती,<br>
स्थायी समिती,<br>
अहमदनगर महानगरपालिका